सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना
गणेशखिंड, पुणे ४११ ००७

संदर्भ क्र. विविमं/२०२५—२६/१०६ **शुद्धी पत्र** दिनांक : २६/०८/२०२५

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय : स्वामी विवेकानंद शिकागो भाषण कृती कार्यक्रमाबाबत.**
**संदर्भ** : जयंत गोपाळ रानडे यांचे दिनांक ०९/०७/२०२५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, विश्वबंधुत्वदिनाच्या निमित्ताने सांगलीतील काही नागरिकांनी दिनांक १२ जानेवारी ते ११ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत तीन कृती कार्यक्रम करावेत असे सूचविले आहे.

समाजातील अनेक प्रश्नांचे मुळ ‘स्व’ चा बोध नसणे ‘स्व’ राष्ट्राचा बोध नसणे व सर्व मानव सुखी होतील यासाठी कोणत्या मूल्यांची जपणूक केली पाहिजे, याविषयीची नीट समजूत व गांर्भीय व्यक्तींना नसणे असे वाटते. मानवी जीवनाची सार्थकता, राष्ट्रीय सर्वांगीण परम वैभवाची नेमकी दिशा आणि त्यामधून होणारी मानवी जीवन सुखी होण्याची धारणा या तीनही गोष्टी नीट समजून देण्यासाठी अंगभूत शक्ती असलेले जागतिक सर्वधर्म परिषदेतील स्वामी विवेकानंदांचे पाच मिनिटांचे हे भाषण आहे. त्यासंबंधीचे पुढील विषयावर आधारित तीन कृती कार्यक्रम महाविद्यालये/परिसंस्थांनी आपल्या स्तरावर आयोजित करावे.

१. स्वामी विवेकानंदाचे शिकागोमधील भाषण पाठ म्हणण्याच्या स्पर्धा घेणे.
२. ते भाषण शुद्ध मराठी, हिंदी अथवा इंग्रजीत लिहिण्याच्या स्पर्धा घेणे.
३. पाच मिनिटांचे भाषण, कलोचित समजावून देणारे भाषण करणे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/शैक्षणिक विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांना जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होण्याबाबत सांगावे. तसेच सदरचे पत्र आपल्या विभागातील मुख्य सूचनाफलकावर प्रदर्शित करून सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे, वरील कृती कार्यक्रमाची सविस्तर माहिती **विवेकानंद भाषण कृती कार्यक्रम या ॲपवर** उपलब्ध आहे. त्याचबरोबर आपल्या महाविद्यालयामध्ये खालील विषयांवर आधारित कार्यक्रमाचे आयोजन करण्यात यावेत.

१. व्याख्यानाचे आयोजन : विषय — स्वामी विवेकानंदांची शिकागो सर्वधर्म परिषदेतील भाषणे किंवा स्वामी विवेकानंदांची अमेरिकेतील भाषणे.
२. स्वामी विवेकानंदांची शिकागो येथील इंग्रजी भाषणाचे वाचन आणि त्यावर विचार मंथन.
३. स्वामी विवेकानंदांचे शिकागो येथील भाषणाचा मराठी अनुवाद त्याचे वाचन आणि त्यावर विचार मंथन.
४. श्रामकृष्ण मठ प्रकाशित ‘‘शिकागो व्याख्याने — स्वामी विवेकानंद’’ या ३० पानी पुस्तिकेतील उताऱ्याचे वाचन आणि त्यावर विचार मंथन.

(डॉ. सदानंद भोसले)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार) राष्ट्रीय सेवा योजना

(डॉ. अभिजीत कुलकर्णी)
संचालक, (अतिरिक्त कार्यभार) विद्यार्थी विकास मंडळ

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
॥ य: क्रियावान स पण्डित: ॥

**सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ**
(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)
**विद्यार्थी विकास मंडळ व राष्ट्रीय सेवा योजना**
**गणेशखिंड, पुणे ४११ ००७**

संदर्भ क्र. विविमं/२०२५–२६/०८२ दिनांक : ०८/०८/२०२५

**प्रति,**
**मा. प्राचार्य/मा. संचालक/मा. विभागप्रमुख,**
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित
सर्व महाविद्यालये व परिसंस्था,
विद्यापीठ परिसरातील सर्व शैक्षणिक विभाग.

**विषय** : **स्वामी विवेकानंद शिकागो भाषण कृती कार्यक्रमाबाबत.**
**संदर्भ** : जयंत गोपाळ रानडे यांचे दिनांक ०९/०७/२०२५ चे पत्र.

महोदय,

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये कळविण्यात येते की, विश्वबंधुत्वदिनाच्या निमित्ताने सांगलीतील काही नागरिकांनी दिनांक १२ जानेवारी ते ११ सप्टेंबर, २०२५ या कालावधीत तीन कृती कार्यक्रम करावेत असे सूचविले आहे.

समाजातील अनेक प्रश्नांचे मुळ 'स्व' चा बोध नसणे 'स्व' राष्ट्राचा बोध नसणे व सर्व मानव सुखी होतील यासाठी कोणत्या मूल्यांची जपणूक केली पाहिजे, याविषयीची नीट समजूत व गांर्भीय व्यक्तींना नसणे यामध्ये आहे असे वाटते. मानवी जीवनाची सार्थकता, राष्ट्रीय सर्वांगीण परम वैभवाची नेमकी दिशा आणि त्यामधून होणारी मानवी जीवन सुखी होण्याची धारणा या तीनही गोष्टी नीट समजून देण्यासाठी अंगभूत शक्ती असलेले जागतिक सर्वधर्म परिषदेतील स्वामी विवेकानंदांचे पाच मिनिटांचे हे भाषण आहे. त्यासंबंधीचे पुढील विषयावर आधारित तीन कृती कार्यक्रम महाविद्यालये/परिसंस्थांनी आपल्या स्तरावर आयोजित करावे.

१. स्वामी विवेकानंदाचे शिकागोमधील भाषण पाठ म्हणण्याच्या स्पर्धा घेणे.
२. ते भाषण शुद्ध मराठी, हिंदी अथवा इंग्रजीत लिहिण्याच्या स्पर्धा घेणे.
३. पाच मिनिटांचे भाषण, कलोचित समजावून देणारे भाषण करणे.

आपल्या महाविद्यालय/परिसंस्था/शैक्षणिक विभागातील सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवक यांना जास्तीत जास्त प्रमाणात सहभागी होण्याबाबत सांगावे. तसेच सदरचे पत्र आपल्या विभागातील मुख्य सूचनाफलकावर प्रदर्शित करून सर्व विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेतर सेवकांच्या निदर्शनास आणून द्यावे, वरील कृती कार्यक्राची सविस्तर माहिती **विवेकानंद भाषण कृती कार्यक्रम या ॲपवर** उपलब्ध असून अवलोकनाकरिता सविस्तर पत्र सोबत जोडून पाठवित आहे. कळावे, ही विनंती.

**(डॉ. सदानंद भोसले)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
राष्ट्रीय सेवा योजना

**(डॉ. अभिजीत कुलकर्णी)**
संचालक, (अतिरिक्त कार्यभार)
विद्यार्थी विकास मंडळ

12.04 10.17 PM 17 JUL 2025
मार्गशीर्ष शु.४/५-१२-२४ कलियुगाब्द ५१२६
महर्षि अरविंद पुण्यस्मरण

मा. कुलगुरु यांचे कार्यालय
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
आवक -9-
दिनांक 16 JUL 2025
आवक क्रमांक 3583
जावक दिनांक 16 JUL 2025

विद्यार्थी विकास मंडळ
आवक क्र. 2333
17 JUL 2025
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

जयंत गोपाळ रानडे
'आर्यावर्त'.गव्हर्नमेंट कॉलनी
पो.-विश्रामबाग,जि.सांगली
पिन. ४१६४१५/१-७-२५

# स्वामी विवेकानंद शिकागो भाषण कृती कार्यक्रम

Version 2025.02.04

प्रति - मा. कुलगुरु, सावित्रीबाई फुले पुणे युनिव्हर्सिटी पुणे

११ सप्टेंबर २०२४ विश्वबंधुत्वदिनाच्या निमित्ताने, तीन कृती कार्यक्रम काही संस्थांना सुचविले होते त्यास ४०पेक्षा अधिक संस्थांचा चांगला प्रतिसाद मिळाला. १९० जणांनी भाषण पाठ म्हटले. व ८५०० जणांनी लिहिले. काही भाषणेही झाली. आता १२ जानेवारी २०२५ स्वामी विवेकानंद जयंती ते विश्वबंधुत्व दिवस ११ सप्टेंबर २०२५ या कालावधीत हे तीन कृती कार्यक्रम **महाराष्ट्र राज्यातील, समाजातील शैक्षणिक संस्थासह अन्य सर्व संस्थानी करावेत अशी विनंती करण्यासाठी आम्ही सांगलीतील काही नागरिक** (आमची कोणतीही संस्था नाही.) आपणास हे पत्र पाठवीत आहोत.

समाजातील अनेक प्रश्नांचे मूळ 'स्व' चा बोध नसणे, 'स्व' राष्ट्राचा बोध नसणे व सर्व मानव सुखी होतील यासाठी कोणत्या मूल्यांची जपणूक केली पाहिजे, याविषयीची नीट समजूत व गांभीर्य व्यक्तींना नसणे यामध्ये आहे असे वाटते. मानवी जीवनाची सार्थकता, राष्ट्रीय सर्वांगीण परम वैभवाची नेमकी दिशा, आणि त्यामधून होणारी मानवी जीवन सुखी होण्याची धारणा या तीनही गोष्टी नीट समजून देण्यासाठी **अंगभूत शक्ती असलेले जागतिक सर्वधर्म परिषदेतील स्वामी विवेकानंदांचे पाच मिनिटांचे हे भाषण** आहे.

त्या संबंधीचे तीन कृती कार्यक्रम समाजातील सर्व व्यक्ती व संघटनांनी करावेत, यासाठी सुचवीत आहोत.

1. स्वामी विवेकानंदांचे भाषण पाठ म्हणण्याच्या स्पर्धा घेणे. त्यासाठी नमुना ध्वनिफीत सोयीसाठी पाठवीत आहोत.
2. ते भाषण शुद्ध मराठी, हिंदी अथवा इंग्रजीत लिहिण्याच्या स्पर्धा घेणे. यासाठी लिहिण्याच्या कागदासह भाषणाची पीडीएफ पाठवीत आहोत. एका कागदावर ते भाषण आहे. व दुसऱ्या कागदावर ते लिहावयाचे आहे.
3. पाच मिनिटांचे भाषण, **कालोचित समजावून देणारे भाषण** करणे, यासंबंधीचीही आवश्यक ती माहिती पाठवीत आहोत.

वरील आठ महिन्यांच्या कालावधीत सर्वांनी हे कार्यक्रम **आपापल्या संस्थेचे म्हणून करावेत** व त्यांचे वृत्त दिलेल्या तक्त्यामध्ये भरून दिलेल्या लिंकवरून आमचे ॲपवर आमचेकडे माहितीसाठी पाठवावे अशी विनंती आहे. ॲप डाउनलोडची लिंकदेखील दिलेली आहे. त्यानंतर, आवश्यकता असल्यास, ॲप व त्याची लिंक यासाठी आमच्याकडे अवश्य विचारणा करावी. अवधी पुरेसा असल्यामुळे तीनही कार्यक्रम पूर्व योजनेने व पूर्व तयारीने करावेत. त्याशिवायही जे काही चांगले सुचेल तेही अवश्य जनजागरणाच्या दृष्टीने करावे.

आपल्या संपर्कातील व्यक्तींना व समूहांना हा संदेश अवश्य पाठवावा. व कार्यक्रम झाल्यानंतर वृतही आमचेकडे पाठवण्यासाठीचे स्मरण द्यावे. अथवा आपण वृत्त मिळवून आमचेकडे पाठवावे.

पाचवीपासून पुढील सर्व स्तराच्या शिक्षण संस्था, विद्यापीठे, महाविद्यालये, सर्व सेवा संस्था, सर्व व्यवसायी आर्थिक व अन्य संस्था, पंथ, संप्रदाय, जाती यांच्या संस्था, क्रीडा संस्था, ज्येष्ठ नागरिकांच्या संस्था, महिलांच्या सर्व संस्था, आध्यात्मिक संस्था, सहनिवासातील संस्था, कुल संस्था, गणेश मंडळे, शिवजयंती मंडळे, कुटुंबातील सर्वांनी, गल्लीतील सर्वांनी इत्यादी सर्वांनीच यामध्ये सहभागी होऊन **आपापले अंत:करण अधिक शुद्ध करावे. स्वामी विवेकानंदांच्या प्रेरक विचाराने बुद्धी आणि भावनाही शुद्ध करावी.**

वर्षभरानंतर पुढे काय करावयाचे? याविषयी आम्ही आत्ता कोणताही विचार केलेला नाही, सर्वांकडून मिळणारा प्रतिसाद, सूचना, मार्गदर्शन, व ठिकठिकाणी आलेले अनुभव या आधाराने वर्षभराने पुढे काय करावे? यासंबंधी विचार करावा, अशी आमची भूमिका आहे.

**तीनही कार्यक्रम करणे महत्त्वाचे आहे. अशा हेतूने याकडे पहावे, विशिष्ट दिवशी, मुहुर्त या अर्थाने, कार्यक्रम करणे हा मुद्दा गौण आहे. असे ध्यानी घ्यालच.**

स्पर्धेच्या निमित्ताने आवश्यक असणारी द्यावयाची बक्षिसे (उदा. विवेकानंदांची पुस्तके, विवेकानंदांचा पुतळा अथवा फोटोची प्रेम, तसेच A4 आकाराचे विवेकानंदांचे फ्रेम केलेले भाषण इ.) व अन्य किरकोळ खर्च त्या त्या संस्थेनेच करावयाचा आहे. त्याचे वृत्त आम्हास देण्याची आवश्यकता नाही. लेखन स्पर्धेच्या वेळी संबंधितास A4 आकाराच्या कागदावरील स्वामीजींचे भाषण व त्यांनी लिहिलेले भाषण, तपासणीनंतर त्यांचेकडेच द्यावयास हरकत नाही, त्यांचेकडे ते सुरक्षित राहील. **संस्कार दृढ होण्याचे दृष्टीने प्रतिवर्षी हे तीन कार्यक्रम करणे व्यक्ती व समाजाचे जीवन निर्मळ होण्यास खूप साहाय्यक होईल असे वाटते.**

संस्थेत भाषण करावयास जाणाऱ्या वक्त्याने या **व्याख्यानाचे** मानधन घेऊ नये अशी आमची विनंती आहे. याकडे **आध्यात्मिक साधना** या दृष्टीने पाहणे योग्य राहील असे वाटते. वृत्त कसे द्यावयाचे तो तक्ता ॲप वर सूचनासह स्वतंत्र जोडत आहोत.

| | | | |
|---|---|---|---|
| श्री. जयंत रानडे, (संयोजक) | ९८२२८६१६८४ | श्री. संजय धामणगावकर | ९४२२९२५७५५ |
| श्री. महादेव जोगळेकर | ९६२३८२३९३६ | श्री. श्रीनिवास (बापू) कुलकर्णी | ९४२२०४१९६१ |
| श्री. रणधीर पटवर्धन | ९८२२५२७१३२ | श्री. बाळासाहेब गायकवाड | ९४२२०४१८२७ |
| श्री. बाळासाहेब पाटील | ९४०४२९०२५० | श्री. देवानंद लोंढे | ९८२२१९१२३३ |
| सौ. अर्चना मुळे | ९८२३७८७२१४ | श्री. डॉ. विकास कुऱ्हेकर | ९८२२४००७६२ |
| श्री. रमेश कोटिभास्कर | ९४२२५४१६६२ | श्री. सुधीर कोलप | ९८६००६९००८ |
| श्री. विजय गावडे | ७५८८१६७०३४ | श्री. डॉ. मनोज पाटील | ९४०४९९०१०८ |

[ टीप - ज्या शिक्षण संस्थेचे शिक्षार्थी सर्वाधिक संख्येने भाषण पाठ केलेले असतील,त्या संस्थेस आम्ही एक लाख रुपयांचे पारितोषिक देणार आहोत. कृपया तपशील ॲप मध्ये पहावा. ]

सर्व मान्यवरांनी आवाहनावर स्वाक्षरी करण्यासाठी **आनंदाने अनुमती दिली.** वेळेअभावी आम्हीच अनेकांना भेटू शकलो नाही. तथापि सर्वांनी, आपापल्या क्षेत्रातील मान्यवरांचा सहयोग आणि मार्गदर्शन, कृतिकार्यक्रम प्रभावीपणे यशस्वी करण्यासाठी अवश्य घ्यावे. सर्वत्र आमच्याप्रमाणेच आपल्याला अनुभव येईल असा विश्वास वाटतो.

स्वामी विवेकानंदानी भारत माता जगाच्या गुरुस्थानी विराजमान होत असल्याचे दृश्य पाहिले होते. ते साकार होण्यामध्ये आमचा सहभाग राहीलच. आपल्या सर्व जनतेचाही सहभाग असावा तसेच मानवी जीवन सार्थकी लागावे व आपल्या श्रेष्ठ सांस्कृतिक कालोचित वारसासह आपले राष्ट्र परमवैभवास पोहोचावे व त्याचा परिणाम म्हणून, सर्व जगाने भारताचे अनुसरण करून सुखी व्हावे यासाठी, जगनियंत्याने सर्वांना वरील तीन कार्यक्रमात सहभागी होण्याची प्रेरणा द्यावी अशी त्याचे चरणी प्रार्थना आहे.

आपले नम्र,

आवाहनकर्त्यांची नावे

प.पू. आचार्य गोविंददेव गिरि महाराज
पद्मश्री डॉ. विजय भटकर, श्री.गुरुदेव शंकर अभ्यंकर
श्री. चारुदत्त आफळे, कीर्तनकार
स्वामी मेधजानंद, चिन्मय मिशन, खोपोली
श्री. विवेक घळसासी, श्री. शरद माधव पोंक्षे
श्री. अभय बापट महाराष्ट्र प्रांत प्रमुख, विवेकानंद केंद्र, कन्याकुमारी
श्री. डॉ. जयंतीभाई भाडेसिया पश्चिम क्षेत्र मा. संघचालक, राष्ट्रीय स्वयंसेवक संघ

पूज्य काडसिद्धेश्वर महाराज कोल्हापूर
स्वामी श्रीकांतानंद, अध्यक्ष रामकृष्ण मठ, पुणे
मा. प्रल्हाददादा वामनराव पै, लाईफ ट्रस्टी जीवनविद्या मिशन, मुंबई
श्री. अविनाश धर्माधिकारी (IAS) चाणक्य मंडल
श्री. मोरेश्वर घैसास गुरुजी प्रधानाचार्य, वेदभवन, पुणे
श्री. प्रवीण विठ्ठल तरडे
श्री. डॉ. मुकुंद दातार अध्यक्ष, गीताधर्म मंडळ, पुणे

ॲपचा क्यू आर कोड

ॲपची लिंक

https://play.google.com/store/apps/details?id=com.mgn.vivekanand&pcampaignid=web_share

आपला,
जयंतरानडे.
संयोजक,
शिकागो भाषण कृती कार्यक्रम